# मिरा-भाईंदर महानगरपालिका

**मुख्य कार्यालय**
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.),
ता.जि.ठाणे – 401 101

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

पा.पु.

**जा.क्र.मनपा/** 1794 /2021-22 दि.01/11/2021

**विषय :-** "माझी वसुंधरा अभियान" अंतर्गत राबविण्याचे विविध उपक्रमाबाबत.

उपरोक्त विषयानुसार माझी वसुंधरा अभियान हे अभियान महाराष्ट्र शासनामार्फत राबविण्यात येत आहे. सदर अभियानांतर्गत शासनाने नेमुन दिलेले सर्व कार्यक्रमाची अंमलबजावणी महानगरपालिकेमार्फत केली जात आहे.

मिरा-भाईंदर महानगरपालिकेमार्फत महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना या अभियानामध्ये सक्रीय सहभाग घेण्यासाठी "इंटर्नशिप प्रोग्रॅम" सुरु करण्यात आलेला आहे.

इंटर्नसद्वारे माझी वसुंधरा अभियानातील पृथ्वी, अग्नी, जल, वायु आणि आकाश वर नाविन्यपूर्ण संकल्पना तयार करण्यात आलेल्या असुन त्या नाविन्यपूर्ण संकल्पनांचा आपल्या विभागामार्फत सर्व अंगानी अभ्यास करुन त्याचा अहवाल तयार करण्यात यावा.

माझी वसुंधरा अभियानातील तत्वानुसार संकल्पना

अ) **पृथ्वी** –

सध्या महानगरपालिकेद्वारे सुका-ओला कचरा विलगीकरण करण्यात येत आहे त्यामध्ये तांत्रिक गोष्टींची जोड देवुन सर्व सोसायटीमध्ये अंतर्भूत विलगीकरणासाठी सुका-ओला कचऱ्याचे वेग-वेगळे पाईप बसवुन सोसायटीमध्ये बसविण्यात आलेल्या टँकमध्ये विलगीकरण करुन ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया करण्याचा महानगरपालिकेचा मानस आहे. (Segregation and Collection of Waste)

**ब) वायू** –

१) धुळीमुळे सर्व बांधकाम क्षेत्रामध्ये कामागारांना होणारा त्रास कमी करण्यासाठी धुळ निर्माण होणाऱ्या ठिकाणी "Dust Absorber" बसविण्याचा संकल्प

२) सुपर ट्री – उद्यानामध्ये संकल्पना राबविणे (वायु शुध्दीकरणासाठी)

**क) अग्नी** – Solar Light Installation

**ड) जल** – सर्व STP / तलाव सुशोभिकरणासह, पेंटींगद्वारे अभियानाचा संदेश (एकुण कार्यरत STP ०८ आहे)

**इ) आकाश** - विविध स्पर्धा राबविणे. (ईप्लेज, बुथ कॅम्प – नागरीकांच्या जनजागृतीसाठी, विविध जनजागृतीपर अभियान, जनजागृतीपर आधारीत स्पर्धा, इ.)

माझी वसुंधरा अभियानामध्ये जवळपास ५००० गुणांची परिक्षा होणार असुन यादृष्टीने हे नाविन्यपूर्ण संकल्पना राबविणे अतिआवश्यक असल्याने, सर्व इंटर्नसना सर्वोतोपरी सहकार्य करणे सोबतच "माझी वसुंधरा अभियानामध्ये" विभाग राबवित असलेल्या संकल्पना / प्रकल्प / अभियानाची माहिती देखील या अहवालासोबत छायाचित्रासह देण्यात यावी.

सर्व **अहवाल / माहिती दिनांक १० नोव्हेंबर २०२१ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत कार्यालयात जमा करण्यात** यावी. यामध्ये होणार नाही याची सर्व अधिकाऱ्यांनी दक्षता घ्यावी.

सोबत – पंचतत्वानुसार (पृथ्वी, अग्नी, जल, वायु, आकाश) संकल्पनांची प्रत.

**(दिलीप ढोले)**
**आयुक्त**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रति,**

**१) अतिरिक्त आयुक्त (सर्व)**
**२) उप-आयुक्त (सर्व)**
**३) शहर अभियंता**
**४) सहा. संचालक, नगररचना**
**५) सर्व खातेप्रमुख / सर्व विभागप्रमुख**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**